INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह
## (A Current Thoughts in Historiography)

**डॉ. कांतराव किसनराव कलाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय,
नेकनूर ता.जि. बीड.
E-mail: kalanekantrao@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::**https://doi-ds.org/doilink/01.2026-16972718/IRJHIS2509016/September 2025

**प्रस्तावना :**

'इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ यामधील कधीही न संपणारा संवाद होय '[1] इ.एच.आर. यांच्या या मताचा धागा पकडून असे म्हणता येईल की, इतिहास संशोधन आणि लेखन सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया आहे प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची ही परंपरा अखंडितपणे चालू आहे या लेखन परंपरेने अनेक वळणे घेत नवनवीन विचार प्रवाह निर्माण केले. अनेकदा गतकाळाची वाटचाल रेखाटली गेली व ती पुन्हा पुसून दुरूस्त स्वरूपात मांडली गेलीसाधारणत: इतिहासाची मांडणी कालपरत्वे, देशपरत्वे आणि उपलब्ध साधनांपरत्वे सतत बदलत जाते. त्यामुळेच असे म्हटले जाते की, इतिहास ग्रंथाचे साधारण आयुष्य जास्तीत जास्त शंभर वर्षाचे असते.[2] या कालखंडात अनेक नवीन दृष्टीकोन विकसित होतात, नवनवीन पुरावे हाती येतात, त्यातून प्रस्थापित इतिहास ग्रंथ कालबाह्य ठरू लागतो.

गतकाळातील घटनांची जुळणी करताना जसा दृष्टीकोन असेल त्याप्रमाणे त्या घटनांचेस्वरूप दिसते. बदलत्या परिस्थितीनुसार जर या दृष्टीकोनात बदल झाला तर इतिहास लेखनातील विचार प्रवाह बदलतात. व्हॉल्टेअर, व्हिको, हेगेल, लिओपोल्ड रँके यांनी मांडलेल्या इतिहासाच्या तत्वज्ञानातून इतिहासाचे बदलते स्वरूप दिसून आले इतिहासाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहण्याचा विचार रँकेने मांडला डॉ. कोसंबीसारख्या भारतीय इतिहासकाराने इतिहासाकडे बघण्याच्या भौतिकवादी दृष्टीकोनाचा आपल्या पध्दतीने अर्थ लावून पूर्वीचा विचार बाजूला सारला. कार्ल मार्क्स, एंगल्स यांनी इतिहासाचा अर्थ नव्या दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्नकेला. '**मानवजातीचा समग्र इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास होय.**' ही मार्क्सची मांडणी शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करून मानव जातीचा इतिहास हा लिंग संघर्षाचा इतिहास होय अशी मांडणी केली.[3] यातून पुढे वंचित समाजासंदर्भाचा विचार केला गेला

**उद्देश :**

1) इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह जाणून घेणे.

2) उपेक्षितांना नवीन विचार प्रवाहात आणणे.

3) उपेक्षितांचा इतिहास समाजासमोर आणणे.

**गृहीतकृत्ये :**

1) उपेक्षितांचा इतिहास आजही अपूर्ण आहे

2) उपेक्षित / वंचित घटकाला वगळून केलेले लिखान हे अपूर्ण आहे

**भारतीय इतिहास लेखनातील आधुनिक विचार प्रवाह :**

आधुनिक काळातील बदलत्या विचार प्रवाहातून विशिष्ट गृहितके सिध्दांत यांच्या आधारे इतिहास लेखन होत गेले नववसाहतवाद, राष्ट्रवाद, मार्क्सवाद इत्यादी दृष्टीकोनातून बदलते स्वरूप दिसून येते यातूनच '**सबाल्टर्न**' या संज्ञेने प्रसिध्दीस आलेला इतिहास लेखन प्रवाह पुढे आला. या प्रवाहाने परंपरागत इतिहास लेखनाला छेद देऊन या क्षेत्रात नवी आव्हाने उभी केली. इतिहास लेखनासाठी नवी क्षितिजे खुली केली व भारतीय इतिहास लेखनाला नवी दिशा व नवा आयाम देऊन नव्या पर्वाचा आरंभ केला[4]

सबाल्टर्न विचार प्रवाहाचा उदय वस्तुत: दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या इतिहासाच्या व्यापक संदर्भात झाला ह्या प्रदेशावर द्वितीय महायुध्दापूर्वी कित्येक वर्षे वसाहतवादी पाश्चात्य राष्ट्रांचे शासन होते या दीर्घ कालावधीत स्थानिक लोकांनी अनेकदा परकीय शासनाविरूध्द विद्रोह केला, उठाव केले. अशा उठावात जनसामान्यांचा मोठा सहभाग होता. परंतु इतिहास ग्रंथातून त्यांच्या सहभागाचा निर्देश किंवा त्यांच्या कामगिरीचे यथार्थ दर्शन घडले गेलेले नाही; अशा व्रिदोही उठावातील समाजाच्या तळागळातील जनसूहांच्या कार्याची माहिती करून घेतल्याखेरीज तत्कालिन इतिहासाचे सम्यक दर्शन होणार नाही या धारणेतून असे संशोधन व लिखान करण्याच्या हेतूने **'Centre of South Aisan Cultural Studies'** ह्या संस्थेची पायाभरणी करण्यात आली. या संस्थेच्या स्थापनेत डॉ. रणजीत गुहा यांचा मोलाचा वाटा ठरला. गुहा यांनी इतिहासाच्या ह्या दृष्टीकोनाबाबत काही भारतीय इतिहास अभ्यासकांशी चर्चा केली. ब्रिटीशांच्या भारतावरील वसाहतिक शासन काळातील विद्रोही चळवळींचे नव्या दृष्टीकोनातून अध्ययन करण्याची गरज प्रतीत झालेले काही इतिहासकार एकत्रित आले आणि त्यांनी सामुहिकरित्या जाणीवपूर्वक इतिहास क्षेत्रातनव्या प्रयोगाचे पर्व सुरू केले. डॉ. रणजीत गुहा यांनी पुरस्कृत केलेल्या सबाल्टर्न प्रवाहाचा तात्विक आधार अन्तोनिओ ग्रामची ह्या इटालियन मार्क्सवादी विचारवंताच्या लिखाणात आढळून येतो.[5] येथूनच पुढे खऱ्या अर्थाने उपेक्षितांच्या इतिहास लेखनाचे पर्व सुरू झाले असेम्हणता येईल.

सबाल्टर्न हा शब्द ग्रामची इटालियन लष्कारातील निम्न स्तरातील कॅप्टनच्या पदाखाली असलेल्या दुय्यम अधिकाऱ्याकडे निर्देशित करतो. ग्रामचिला अभिप्रेत असलेला या शब्दाचा अर्थ असा की, लष्करी मोहिमात प्रत्यक्ष लढण्याचे काम हा दुय्यम अधिकारी करतो, त्याच्या सक्रीय सहभागाशिवाय कोणतीही मोहित अमंलात येत नाही. परंतु लष्करी मोहिमांच्या यशाचे श्रेय मात्र नेहमी लष्काराचे नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दिले जाते. त्याप्रमाणे कोणत्याही सामुहिक कार्यात, चळवळीत, उठावांत भिन्न समाज गटांचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु ह्या मोलाच्या सहभागाच्या श्रेयापासून ते वंचित/ उपेक्षित ठेवले जातात.[6] त्यांच्या कार्याचा निर्देशही केला जात नाही. ग्रामचीचा हा विचार रणजीत गुहा यांनी स्विकारला आणि तो इतिहासाच्या अध्ययनाला लागू केला समाजातील वंचित / उपेक्षित समूहांचा किंवा गटांचा इतिहास अभ्यासणाऱ्या नव्या इतिहास प्रवाहाचे **'सबाल्टर्न'** असे नामकरण केले गेले.

**भारतीय इतिहास लेखनासंबंधी डॉ गुहांचे आक्षेप:**

डॉ. रणजीत गुहा हे भारतातील आजवरच्या इतिहास लेखनांची भूमिका व दृष्टीकोन नाकारतात आणि इतिहास लेखनाबाबतचा

आपला दृष्टीकोन मांडतात. आजवरच्या इतिहास लेखनासंबंधी त्यांनी पुढील आक्षेप घेतले आहेत

1) आजवर आधुनिक भारताचा लिहिला गेलेला इतिहास अभिजन वर्गाने लिहिलेला असून तो त्या वर्गाच्या वैचारिक भूमिकेतून लिहिला गेला आहे. तसाच तो अभिजन वर्गासाठीच लिहिला गेला असल्यामुळे त्याचे लिखाण अभिजन केंद्रित झाले आहे.

2) भारतीय राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व अभिजन वर्गातून पुढे आले त्यामुळे या वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इतिहासकारांनी त्यांचेच कार्य अधोरेखित केले व चळवळींचे श्रेय त्यांच्या पदरी टाकले.

3) कोणत्याही व्यापक चळवळीत जनसमूहांचा, गटांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्याशिवाय चळवळ व्यापक व प्रभावी होत नाही. मात्र आजपर्यंतच्या इतिहास लेखकांनी याची दखल न घेतल्यामुळे सामान्य जनसमूहांना त्यांच्या मौलिक सहभागाच्या श्रेयापासून वंचित ठेवले.

4) काही इतिहासकारांनी शेतकरी, कामगार, महिला इत्यादी गटांच्या सहभगाचा निर्देश लिखानात केला असला तरी त्यांचे चळवळीतील स्थान स्वतंत्र विचारशक्ती व अंत: प्रेरणा नसलेल्या, नेत्यांच्या पाठोपाठ आंधळेपणाने निर्बुध्दपणे जाणाऱ्या मेंढरांच्या कळपासारखे असल्याचे सूचित केले हे वास्तव्य इतिहास दर्शन नाही.

5) ब्रिटीश साम्राज्यवादी इतिहासकारांप्रमाणे अनेक राष्ट्रवादी इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रवादी चळवळीमागील वैचारिक बैठक पाश्चात्य शिक्षणने प्रसुत केलेल्या राष्ट्रवाद, उदारमतवाद, लोकशाही अशा संकल्पनांनी तयार केली असे भाष्य करून चळवळीच्या उभारणीचे श्रेय पाश्चात्य विचारांना दिले व भारतीयांच्याअंत: प्रेरणाकडे दुर्लक्ष केले

6) साम्राज्यवादी व राष्ट्रवादी इतिहासकारांप्रमाणे भारतीय मार्क्सवादी इतिहास लेखनाबाबतही गुहा यांनी आक्षेप घेतला. मार्क्सवादी इतिहासकारांप्रमाणे कामगार, शेतकऱ्यांच्या कार्याची दखल घेतली असली तरी राष्ट्रीय उठावांमागील प्रेरणा समाजातील सुशिक्षित बुध्दीवंतांची, अभिजनांची होती हे गृहित धरले आहे शेतकरी, कामगार गटांच्या उठावामागील त्यांची मानसिकता, विचार, प्रेरणा विचारात घेऊन उठावांची मिमांसा केली नाही[7]

थोडक्यात आजवरच्या इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास एकांगी, पक्षपाती, वास्तवाचे दर्शन न घडविणारा आहे व म्हणून अनैतिहासिक आहे. समाजाच्या निम्न स्तरावरील गटांना, जनसमूहांना त्यांच्या इतिहासातील वाजवी स्थानापासून ह्या इतिहासाने वंचित उपेक्षित ठेवले आहे. ही उणीव भरून काढणे हे '**सबाल्टर्न**' इतिहास प्रवाहाचे उदिदष्ट आहे असे म्हणता येईल.

**अभ्यासविषय व दृष्टीकोन :**

सबाल्टर्न इतिहास लेखनाने प्रारंभी ब्रिटीश शासन काळातील शेतकरी, कामगार, आदिवासी इत्यादी च्या उठावाने त्यांच्या विद्रोही भूमिकांचे विश्लेषण करण्यावर लक्ष केंद्रीत केले अशा विषयांबरोबरच अंकितत्व, प्रभुत्व, प्रतिरोध, राष्ट्रवाद, जमातवाद, धर्मनिरपेक्षता, राजकीय व धार्मिक झुंडशाही अशा अनेक मुलभूत संकल्पनांचा ऊहापोह करतात.स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळातील विषयानंतर स्वतंत्र्योत्तर काळातील समस्यांकडे ते वळल्याचे दिसून येते[8] भिन्न समाज गटांतील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक संकेतांचा, त्यांच्यातील सत्ताकेंद्राचा व भिन्न सत्ताकेंद्रातील परस्पर संबंधाचा, क्रिया – प्रतिक्रियांचा मार्मिक ऊहापोह ह्या लिखानात दिसून येतो

वंचित / उपेक्षित गटांच्या जाणिवांचे वास्तव स्वरूप काय आहे? त्यांची मानसिकता कशी तयार होते? भिन्न प्रदेशातील समान गटांच्या उठावामागील उदिष्टये समान आढळतात का? विद्रोही गटाचे नेतृत्व कोण करते? असे अनेक प्रश्न या इतिहास लेखन प्रवाहाने अभ्यासले आहेत. सबाल्टर्न या संज्ञेची व्याख्या अशोक सेन यांनी सबाल्टर्न स्टडिजच्या पाचव्या अंकातील आपल्या"Capital, class

and community" ह्या लेखात "The tern subaltern is used to denote the entire people that is subordinate is term of class, caste, age, gender and office or in any other way." अशी केलेली आहे.[9] यावरून सबाल्टर्नची विषय मर्यादा व्यापक असून त्यात समाजातील कोणत्याही वंचित, पददलित, शोषित, दुर्लक्षित समूहाचा समावेश होतो.

**उपेक्षितांचे इतिहास लेखन :**

सबाल्टर्न विचार प्रवाहातून अनेक भारतीय इतिहासकारांनी उपेक्षितांचा इतिहास आपल्या लेखणीतून रेखाटला. वेगवेगळ्या तात्विक भूमिका घेऊन त्यांनी इतिहास लेखन केले यामध्ये डॉ. शहीद अमिन, डॉ. सुमित सरकार, पार्थ चॅटर्जी, ग्यानेंद्र पांडे, ग्यान प्रकाश, रामचंद्र गुहा, दिपेश चक्रवर्ती, गायत्री चक्रवर्ती इत्यादीची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील.[10] कनिष्ठ स्तरावर मानल्या गेलेल्या जाती, स्त्रिया, परके मानले गेलेले धार्मिक गट, आदिवासी, शेतकरी, कामगार, दलित इत्यादी वंचित गट भारतीय इतिहास लेखानात दुर्लक्षित / उपेक्षित होते. सबाल्टर्नच्या विचार प्रवाहातून या उपेक्षित वर्गास न्याय मिळण्यास मदत झाली. स्वातंत्र्योत्तर भारतात उपेक्षित गटाच्या परिवर्तनाच्या दिशेने प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष लढा सुरू झाला. 1970 च्या दशकात ज्या नव्या सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या त्यातून नव्या पध्दतीने शोषित-वंचितांच्या दृष्टीने इतिहासाचे पुनर्लेखन व्हावे असा विचार वाढीस लागला. फुले-आंबेडकरांच्या विचारसरणीने प्रेरित झालेले जातविरोधी लढे व मार्क्सवादी विचारसरणीने स्फुरलेले वर्गीय लढे यात अधिक देवाण-घेवाण व्हावी याची गरज 1970 च्या दशकात दलित व डाव्या विचारवंतांनी मांडली. कॉ. शरद पाटील यांनी त्याही पुढे जाऊन माफुआद्वारा एक नवीन अन्वेषण पध्दती, नवीन प्रमाणशास्त्र व नवीन तत्वज्ञान जाहीर केले.[11]

डॉ. सुमित सरकार यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीतील जनसामान्यांचा, दुर्लक्षित गटांचा इतिहास रेखाटला. डॉ. शहीद अमिन यांनी 1920 ते 22 सालच्या असहकार आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या मनावरील म. गांधीच्या प्रभावाचे विश्लेषण केले. तसेच 1922 च्या चौरीचौरा प्रकरणाशी संबंधित असलेल्या भिन्न समाज गटांची मनोभूमिका तपासली.[12] पार्थ चॅटर्जी यांनी स्त्रियांचा राष्ट्रीय चळवळीतील सहभाग मांडला. तर ग्यानेंद्र पांडे यांनी स्थानिक लोकांचे राजकारण हे कॉंग्रेसच्या राजकारणापेक्षा वेगळे होते हे दाखवून दिले.[13] अशाप्रकारे अनेक इतिहासकारांनी शोषित, वंचित गटाला न्याय देण्याचा प्रयत्न आपल्या लिखानातून केल्याचे दिसून येते.

**सारांश :**

सबाल्टर्न विचार प्रवाहामधून भारतीय इतिहासाच्या मांडणीला एक नवीन वळण मिळाले. समाजातील ज्या गटाने, वर्गाने, समूहाने खऱ्या अर्थाने इतिहास घडवला असा शोषित / उपेक्षित वर्ग इतिहास लेखनाच्या प्रवाहापासून दूर होता, त्याला इतिहास लेखन प्रवाहात आणण्याचे व न्याय देण्याचे महत्त्वाचे काम सबाल्टर्नच्या माध्यमातून होत आहे. हे काम अद्यापही अपूर्ण आहे. समाजातील अनेक इतिहास निर्माते आजही अंधारात आहेत त्यांना प्रकाशात आणण्याचे काम नव संशोधकांना करावयाचे आहे.

सामान्यांच्या / उपेक्षितांच्या कर्तृत्वाला आधारभूत मानून त्यांचे श्रेय त्यांना द्यावे. गरीब, शेतकरीच स्वत:च्या इतिहासाचा निर्माता होय. त्यादृष्टीने असे म्हणता येईल की, गरीब, शेतकरी, शेतमजूर, गुराखी, दलित समाज व स्त्री वर्ग हे घटक इतिहास निर्मितीचे मानकरी आहेत. जर या वर्गाला बाजूला ठेवून राष्ट्राचा इतिहास लिहिलागेला तर तो अपूर्णच असेल, तो चुकलेला असेल.[14]

एकूणच आजच्या समाजाशी, लोकांच्या राजकारणाशी सबाल्टर्न स्टडी कशा प्रकारे जोडता येईल याचा अभ्यास, विचार झाला तर खऱ्या अर्थाने उपेक्षितांचे लिखान लोकाभिमुख होईल.

**निष्कर्ष :**

1) सबाल्टर्न विचार प्रवाहाने उपेक्षित / वंचित घटकांना न्याय देण्याचे काम केले.

2) सबाल्टर्न या नवीन विचार प्रवाहामुळे उपेक्षितांचा इतिहास समाजासमोर येण्यास मदत झाली

**संदर्भ सूची:**


1) कार ई.एच., इतिहास म्हणजे काय? (अनु.) लेले वि.गो. कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे -1994.

2) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, मार्च, 1997, पृ.क्र. 280.

3) धारणकर सरल, इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन, बिना प्रकाशन, नाशिक, पृ.क्र.75.

4) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.239.

5) कित्ता, पृ.क्र.240.

6) कित्ता, पृ.क्र.241.

7) कित्ता, पृ.क्र.242.

8) गायकवाड, सरदेसाई हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, फेब्रुवारी 1996, पृ.क्र.276.

9) कोठेकर शांता, उपरोक्त, पृ.क्र.244.

10) मोरे, भामरे, चव्हाण, इतिहासाची ओळख, के.एस. पब्लिकेशन्स, पुणे, जुलै, 2006, पृ.क्र.139.

11) धारणकर सरल, उपरोक्त, पृ.क्र.80.

12) कोठेकर शांता, उपरोक्त, पृ.क्र.247.

13) मोरे, भामरे, चव्हाण, उपरोक्त, पृ.क्र.139.

14) व्यास प्रकाशचंद्र, इतिहास लेखनशास्त्र, अभिजित पब्लिकेशन्स, लातूर, जून, 1999, पृ.क्र.292.

15) आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्राज्ञ पाठ्य शाळा मंडळ, वाई, 1967.